# १४. मिठाचा शोध



फार फार वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. इतक्या पूर्वीची, की त्या काळी माणूस जंगलामध्ये गुहेत राहत असे आणि कंदमुळं खाऊन पोट भरत असे. शिकार करून प्राण्यांचं मांस खात असे. त्याला अन्न शिजवून किंवा भाजून खाणं, हे माहीत नव्हतं. इतकंच काय, पण तो कंदमुळं खात असे तीही तशीच अळणी म्हणजे मिठाशिवायच. आज आपण एखादा पदार्थ मिठाशिवाय खाऊ शकणार नाही; पण त्या काळी मीठ म्हणजे काय हेही त्याला ठाऊक नव्हतं.

एके दिवशी असंच जंगलामध्ये भटकताना एका आदिमानवानं काही हरणांना ठरावीक जागी एका झाडाच्या बुंध्यापाशी असणाऱ्या दगडांना चाटताना बघितलं. बरेच दिवस त्यानं या गोष्टीचं निरीक्षण केलं. त्याला खूप आश्चर्य वाटलं. मग त्याच्या मनात कुतूहल जागृत झालं. 'काय असेल बरं हे ? ही हरणं रोज का बरं या जागी हे दगड चाटतात? आपणही बघूयात का चाटून ?'

त्याच्या मनात शंका आली आणि लगेच शंकेचं समाधान करण्यासाठी त्यानं तेच दगड चाटून पाहिले, तर काय ! एक वेगळीच, पण मजेदार चव त्याच्या जिभेवर रेंगाळायला लागली. त्याला ती खूप आवडली. तो रोज त्या जागी येऊन तो दगड चाटू लागला.

तो दगड म्हणजे काय होतं हे माहीत आहे का तुम्हांला ? तो होता खनिज मिठाचा दगड. खनिज मीठ म्हणजे ज्याला आपण 'सैंधव मीठ' म्हणतो.

त्यानंतर त्याला एक युक्ती सुचली. त्या दगडाचे त्यानं तुकडे केले. ते तुकडे आपल्या गुहेत नेऊन ठेवले आणि कंदमुळं खाताना रोज थोडा थोडा दगड चाटू लागला. त्याला आता जेवणात खूप मजा येऊ लागली. हाच दगड फळं खातानाही तो चाटू लागला. असे खूप दिवस गेले आणि एके दिवशी ते तुकडे संपले. मग त्यानं आधीच्या जागेवरून आणखी दगड आणले; पण त्या दगडांना पूर्वीची चव नव्हती. मग त्या आदिमानवाला पुन्हा बेचव, अळणी जेवण खाणं भाग पडू लागलं. आता त्याला शांतपणे बसून राहवेना. त्या दगडाचा शोध घेण्याचा त्यानं खूप प्रयत्न केला; पण तो दगड काही त्याला मिळाला नाही. आता काय बरं करावं ! असा विचार करताना चालत चालत तो त्या जंगलाच्या टोकापाशी म्हणजे जिथे जंगल संपतं अशा जागेवर येऊन ठेपला.

त्याला दिसली एक वेगळ्या प्रकारची माती. ती खूप लांबवर पसरलेली होती आणि त्या मातीनंतर पाणीच पाणी खूप लांबवर पसरलं होतं, की तिथे जाणं शक्यच नव्हतं. त्याला पुन्हा कुतूहल वाटलं.

ते लांबवर पसरलेलं पाणी म्हणजे होता अथांग समुद्र आणि ती वेगळ्या प्रकारची माती म्हणजे वाळूनी भरलेला समुद्राचा किनारा, जो या आदिमानवानं प्रथमच पाहिला होता.

तो चालत चालत त्या समुद्राच्या पाण्यात गेला आणि काय आश्चर्य ! ते पाणी त्याच्या हातापायांना झोंबू लागलं. का, माहीत आहे ? आदिमानवाच्या हातांना आणि पायांना बरंच खरचटलं होतं. जंगलातले काटेकुटे, दगड यांमुळे पायांना बऱ्याच जखमाही झाल्या होत्या. त्यामुळे समुद्राच्या पाण्यामुळे झोंबणं सुरू झालं. त्याला आश्चर्य वाटलं, कारण नदीचं पाणी तर त्याला माहीत होतं, पण ते असं कधी अंगाला झोंबलं नव्हतं. मग पुन्हा त्यानं त्यावर विचार करायला सुरुवात केली. त्यानं थोडं पाणी पिऊनही पाहिलं आणि काय आश्चर्य ! ती चव त्याला ओळखीची वाटली. त्याला खूप आनंद झाला. खनिज मिठाचा जो दगड त्यानं चाटला होता, तशीच चव या पाण्याची होती.

मग त्यानं विचार केला. जेवण म्हणजे कंदमुळं. ती खाताना मधूनमधून हे पाणी प्यायलं तर? पण ते काही त्याला जमेना. ती चव त्याला हवी होती. ते पाणी त्याच्या गुहेपर्यंत नेणंही त्याला शक्य होत नव्हतं. 'काय बरं करावं !' मग पुन्हा त्यानं विचार करायला सुरुवात केली.

त्याला एक युक्ती सुचली. त्यानं समुद्रकिनाऱ्यावर जरा लांब एक खड्डा खणला. त्यात समुद्राचं पाणी साठवलं. मग उन्हामुळे त्या पाण्याची वाफ झाली आणि त्या पाण्यातले क्षार म्हणजे सध्याचं आपण खातो ते मीठ, त्या खड्ड्याच्या तळाशीच राहिलं. मग त्या आदिमानवाला ते सहज आपल्या गुहेत नेता आलं. यानंतर आदिमानवाच्या जेवणाला मस्त चव आली !

(काल्पनिक) **– अंजली अत्रे**

हा पाठ ऐका लेखिका अंजली अत्रे यांच्याच आवाजात खालील लिंकवर ....

**व्हिडिओ पहा**

पाठावर प्रश्न तयार करा.टेस्ट सोडवा.

**ऑनलाईन टेस्ट**

# पूर्वतयारी - उजळणी

स्वाध्याय

१. खालील बेरजा उभ्या मांडणीने करा.

(१) २३०१ + ४०५६ (२) ४०१७ + २०८१ (३) २०१७ + १७०६०

(४) ४७७७ + २००१ (५) ९४१ + ९९०५८ (६) १२३३६ + ५००२१

(७) ७७७७७ + २००१ (८) ९९९ + ४०००

२. आडव्या मांडणीने बेरीज करा.

(१) ७००६ + २१९३ (२) ४११ + ५८८ (३) २७९ + ९७४१०

(४) ५३०४६ + २००१ (५) ७०१३ + ९१४०५ (६) ९२९८ + ८०३०१

३. खालील तिन्ही स्तंभांमधील समान असलेल्या संख्या जोडा.

| | | |
|---|---|---|
| चौदा हजार अधिक तीनशे | ५०९ + १०० | ९९७०२ |
| दोन हजार अधिक नव्वद | १४००० + ३०० | ६०९ |
| पाचशे नऊ + शंभर | ९९००० + ७०२ | २०९० |
| नव्याण्णव हजार + सातशे दोन | २००० + ९० | १४३०० |

बेरीज सराव करा.



# Revision

Exercise

1. Arrange vertically and add.

(1) 2301 + 4056 (2) 4017 + 2081 (3) 2017 + 17060

(4) 4777 + 2001 (5) 941 + 99058 (6) 12336 + 50021

(7) 77777 + 2001 (8) 999 + 4000

2. Add in horizontal arrangement.

(1) 7006 + 2193 (2) 411 + 588 (3) 279 + 97410

(4) 53046 + 2001 (5) 7013 + 91405 (6) 9298 + 80301

3. Match the equal numbers in the three columns.

| | | |
|---|---|---|
| Fourteen thousand plus three hundred | 509 + 100 | 99702 |
| Two thousand plus ninety | 14000 + 300 | 609 |
| Five hundred and nine + one hundred | 99000 + 702 | 2090 |
| Ninety-nine thousand + seven hundred and two | 2000 + 90 | 14300 |

read and solve.

# A GARDEN OF WORDS

| | | | | |
|---|---|---|---|---|
| am | feeling | long | red | tree |
| another | fresh | lovely | run | under |
| are | full | mango | see | us |
| ate | good | nap | sleepy | vegetable |
| behind | have | once | slept | very |
| carrot | he | patch | slow | walked |
| did | I'll | race | slowly | white |
| didn't | leafy | radish | so | wins |
| eat | let | ran | stop | woke |
| fast | little | reached | then | you |

**1. Listen carefully and tick off the words.**

* ate * did * eat * full * good * let * long
* nap * run * stop * tree * very * white * wins

## शब्द वाचा व वहीत लिहा.

मागील घटकांवरील अपडेट होत असलेले सर्व व्हिडिओ पहा.

व्हिडिओ पहा

gurumauli

## १४. नकाशा आणि खुणा



### करून पहा

- तुमच्या शाळेच्या/घराच्या आजूबाजूला असणाऱ्या परिसराचे नीट निरीक्षण करा.
- या परिसरात दिसणाऱ्या विविध गोष्टींची काळजीपूर्वक यादी तयार करा.



### सांगा पाहू





वरील चित्रामध्ये आठ वेगवेगळ्या गोष्टी दाखवल्या आहेत. यांतील काही गोष्टी मानवाने स्वत: तयार केलेल्या आहेत, तर काही निसर्गतः तयार झाल्या आहेत. त्याची वर्गवारी खालीलप्रमाणे होईल.

| निसर्गतः असलेल्या | मानवाने केलेल्या |
| --- | --- |
| नदी | शाळा |
| झाड | पाण्याची टाकी |
| डोंगर | घर |
| गवत | विहीर |

**निसर्ग निर्मित व मानव निर्मित गोष्टींची यादी करा.**

**टेस्ट उद्या...**

# १२. पुरंदरचा वेढा व तह

**सुरतेवर छापा :** या विजयानंतर शिवराय स्वस्थ बसले नाहीत. औरंगजेब बादशाहाच्या फौजा महाराष्ट्रात धुमाकूळ घालत होत्या, तेव्हा बादशाहावर जबर वचक बसवण्यासाठी शिवरायांनी सुरत शहरावर छापा घातला. कुठे पुणे व कुठे सुरत ? सुरत म्हणजे त्या वेळची मुघली मुलखातील मोठी व्यापारपेठ. खूप सधन. शिवरायांनी सुरतेवर छापा घालून लक्षावधी रुपयांची लूट मिळवली. सुरतेच्या लुटीत शिवरायांनी नीती सोडली नाही. चर्च अथवा मशिदी यांना हात लावला नाही. स्त्रियांना त्रास दिला नाही.

सुरतेवरील या आक्रमणामुळे बादशाहा भयंकर चिडला. त्याने मराठ्यांचे राज्य नष्ट करण्याचा निश्चय केला. मिर्झाराजे जयसिंग या आपल्या बलाढ्य सेनापतीला त्याने शिवरायांवर धाडले. त्याच्या सोबतीला दिलेरखान हा आपला विश्वासू सरदार दिला. अलोट खजिना आणि अफाट दारूगोळाही बरोबर दिला. जयसिंग आणि दिलेरखान प्रचंड फौजेसह दक्षिणेत येऊन पोहोचले. स्वराज्यावर फार मोठे संकट आले.

सुरतेच्या मोहिमेवरून शिवराय परततात, तोच सन १६६४ मध्ये त्यांना कर्नाटकातून एक दु:खद बातमी समजली. शहाजीराजे यांचे शिकारीच्या प्रसंगी अपघाती निधन झाले. शिवराय व जिजाऊ यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला. मातोश्रींच्या गळा पडून शिवरायांनी या दु:खातून त्यांना सावरले.



टेस्ट उद्या... पुरंदर किल्ला वाचा व समजून घ्या.

| इयत्ता चौथी - मराठी | महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर |
|---|---|
| 14. मिठाचा शोध | Click Here |
| 15. आनंदाचं झाड | Click Here |
| 16. झुळूक मी व्हावे | Click Here |
| 17. म्हणींच्या गमती | Click Here |
| **इयत्ता चौथी - गणित** | **महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर** |
| शाब्दिक उदाहरणे-बेरीज वजाबाकी | लवकरच |
| अपूर्णांक | लवकरच |
| मापन | लवकरच |
| **इयत्ता चौथी - परिसर अभ्यास - 1** | **महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर** |
| 14 नकाशा आणि खुणा | लवकरच |
| 15. माझा जिल्हा माझे राज्य | लवकरच |
| 16. दिवस व रात्र | लवकरच |
| 17. माझी जडणघडण | लवकरच |
| **इयत्ता चौथी - परिसर अभ्यास - 2** | **महिना – नोव्हेंबर ते डिसेंबर** |
| 12. पुरंदरचा वेढा व तह | लवकरच |
| 13. बादशाहाच्या हातावर तुरी दिल्या | लवकरच |
| 14. गड आला पण सिंह गेला | लवकरच |

Subscribe

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे
वेब स्रोत-'ई-बालभारती'
सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर

https://www.gurumauli.in